महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र उशिप्र-११२६/प्र.क्र.२५/कॅप-२६/विधी 3 वर्ष/**१७१५**/२०२६ दिनांक : **१७ जुलै २०२६**

## जाहीर सूचना

**एलएल.बी. (३ वर्षे) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (CAP) २०२६–२७ : गुणपत्रिकेऐवजी ऑनलाईन निकालपत्र अपलोड करणे व तक्रार निवारण कालावधी वाढविणेबाबत**

शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी एलएल.बी. (३ वर्षे) अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (CAP) मध्ये सहभागी होणाऱ्या उमेदवारांच्या हिताचा विचार करून खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या निदर्शनास आले आहे की, काही विद्यापीठे/महाविद्यालयांनी पात्रता परीक्षांचे निकाल जाहीर केले असूनही संबंधित उमेदवारांना अद्याप अधिकृत गुणपत्रिका (Mark List) उपलब्ध करून दिलेली नाही.

अशा परिस्थितीत, संबंधित उमेदवारांना संबंधित विद्यापीठ/महाविद्यालय/संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावरून डाउनलोड केलेले **ऑनलाईन निकालपत्र/तात्पुरता निकाल (Online Result Sheet/Provisional Result)** हे संबंधित संस्था/महाविद्यालय/विद्यापीठाच्या प्रमुखांच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह प्रमाणित करून आवश्यक कागदपत्र म्हणून अपलोड करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

संबंधित विद्यापीठ/महाविद्यालयाकडून अधिकृत गुणपत्रिका उपलब्ध झाल्यानंतर, प्रवेश प्रक्रियेदरम्यान आवश्यकतेनुसार संबंधित उमेदवारांनी ती अपलोड/सादर करणे बंधनकारक राहील.

त्यानुसार, "**Resolving Grievances related to Alphabetical List**" (Candidates to Edit the Application Form & Upload Required Documents through Candidate Login, if required) या प्रक्रियेसाठीची मुदत **दि. २० जुलै २०२६ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत** वाढविण्यात येत आहे. सर्व उमेदवारांनी वाढीव मुदतीचा उपयोग करून खालील कार्यवाही पूर्ण करावी :

- अर्जामध्ये दुरुस्ती (Edit) करणे, (आवश्यक असल्यास)
- आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे.
- अधिकृत गुणपत्रिका उपलब्ध नसल्यास, संबंधित संस्था/विद्यापीठाच्या प्रमुखांनी स्वाक्षरी व शिक्क्यासह प्रमाणित केलेले ऑनलाईन निकालपत्र अपलोड करणे.

वरील मुदतीत यापुढे कोणतीही वाढ करण्यात येणार नाही. त्यामुळे सर्व उमेदवारांनी अंतिम मुदतीपूर्वी आवश्यक कार्यवाही पूर्ण करावी. अंतिम क्षणी उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणी टाळण्यासाठी मुदतीची प्रतीक्षा करू नये.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई

**सही/-**
**आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी**
**महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा**
**(CET) कक्ष, मुंबई.**

सत्यमेव जयते

GOVERNMENT OF MAHARASHTRA

MAHARASHTRA STATE COMMON ENTRANCE TEST (CET) CELL

8th Floor, New Excelsior Building, A.K. Nayak Road, Fort, Mumbai 400 001

Tele. No. - 022-22016157/53/59 Website -www.mahacet.org E-Mail-cetcell@mahacet.org


No. HED-1126/CR.No.25/CAP-26/LLB 3 Yrs/**1715**/2026 Date : **17 July 2026**

## <u>Public Notice</u>

**LL.B. (3 Years) CAP 2026–27: Submission of Online Result Sheet in lieu of Mark List and Extension of Grievance Resolution Period**

In the interest of the candidates applying for admission through the Centralized Admission Process (CAP) for the LL.B. (3 Years) Programme for the Academic Year 2026–27, the following is notified: Submission of Online Result Sheet in lieu of Mark List

It has been brought to the notice of the CET Cell that the results of certain qualifying examinations have been declared; however, the official mark lists have not yet been issued by the respective Colleges/Universities.

In such cases, candidates may upload the online result sheet/provisional result downloaded from the official website of the concerned University/Institution, provided it is duly certified by the Head of the Institution/College/University (with signature and seal). **Candidates shall be required to upload the official mark list as and when it is issued by the concerned University/Institution, if called upon during the admission process.**

Accordingly, **extension for "Resolving Grievances related to Alphabetical List"** (Candidates to edit the application form and upload the required documents through Candidate Login, if required) **<u>has been extended up to 20 July 2026 (11:59 PM).</u>**

Candidates are advised to utilize the extended period to: for editing their application form, if required; Upload the necessary documents; Upload the duly certified online result sheet, if the official mark list has not yet been issued.

No further extension of the above schedule shall ordinarily be granted. Candidates are advised to complete all pending activities well before the last date to avoid last-minute technical issues.

State CET Cell * Maharashtra - Mumbai

**Sd/-**
**Commissioner & Competent Authority**
**Maharashtra State Common Entrance Test**
**(CET) Cell, Mumbai.**